महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

# उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(३) पुणे यांचे कार्यालय,

राजमाता जिजाऊ सांस्कृतिक भवन, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे - 18
फोन नं. ०२०-२७४२०७१७ ई-मेल — drcspune३@gmail.com

जा.क्र.उनिपुश(३)/गृह/गायत्री/पुनर्विकास/२०२४/२१९४ दिनांक :- १८/१०/२०२४

प्रति,
चेअरमन/सचिव
गायत्री सहकारी गृहरचना संस्था मर्यादित,
स. नं. २८२, प्लॉट नं. ७२/८७, तानाजीनगर, चिंचवड, पुणे ३३

विषय :- इमारत पुनर्विकास करण्यास मंजुरी पत्र
संदर्भ :- १.आपल्या संस्थेकडील दि. २६/०९/२०२४ रोजीचा या कार्यालयास प्राप्त प्रस्ताव व सहपत्रे
२. या कार्यालयाकडील दि. ०३/१०/२०२४ रोजीचे पत्र.
३. प्राधिकृत अधिकारी यांचेकडील दि. ०७/१०/२०२४ रोजीचा अहवाल.

उपरोक्त संदर्भीय विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

२/- आपल्या संस्थेने दि २६/०९/२०२४ रोजी सादर केलेल्या प्रस्तावानुसार संस्थेच्या पुनर्विकासाकरिता अंतिम निर्णय करण्यासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या सर्वसाधारण सभेसाठी प्राधिकृत अधिकारी यांची नियुक्ती करणेबाबत विनंती केलेली होती. त्यानुषंगाने वरील संदर्भ क्र. 2 रोजीच्या पत्रान्वये संस्थेच्या दिनांक ०४/१०/२०२४ रोजीच्या सभेसाठी प्राधिकृत अधिकारी म्हणुन नियुक्ती केलेली होती. प्राधिकृत अधिकारी यांनी सदर सभेस हजर राहुन उक्त नमुद संदर्भ क्र. ३ अन्वये अहवाल दिलेला आहे. सदर अहवालाचे अवलोकन केले असता संस्थेची दिनांक ०४/१०/२०२४ रोजी विशेष सर्वसाधारण सभा घेण्यात आली असुन सदर सभेस एकुण २४ सभासदांपैकी २२ सभासद उपस्थित होते व सर्व २२ उपस्थित सभासदांनी विकसक म्हणुन मे. एम. बी. ग्रुप, चिंचवड, पुणे यांची विकसक म्हणुन निवड करुन सर्वानुमते ठराव मंजुर केलेला आहे.

आपल्याकडील संदर्भ क्र. १ च्या प्राप्त पत्रात संस्थेच्या इमारतीचे पुनर्विकसन करण्यासाठी विकसन करारनामा सादर करावयाचा असुन संस्थेच्या दि. ०४/१०/२०२४ रोजी

घेण्यात आलेल्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये पारीत झालेल्या ठराव क्र. ३ अन्वये मे. एम. बी. ग्रुप, चिंचवड पुणे यांची संस्थेची इमारत पुनर्विकास करण्यासाठी विकसक म्हणुन नियुक्ती केलेली असुन सदर सभेस या कार्यालयाचे सहकारी अधिकारी श्रेणी-१ हे हजर होते.

आपण सादर केलेल्या संस्थेच्या इमारतीच्या पुनर्विकासाकरीता या कार्यालयाच्या ना हरकतीबाबत, आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेच्या इमारतीचे पुनर्विकास करण्यासाठी दि. ०४/१०/२०२४ रोजी विशेष सर्वसाधारण सभेत विकसक मे. एम. बी. ग्रुप, चिंचवड, पुणे यांच्या नियुक्तीचा ठराव पारित झालेला असल्याचे दिसुन येत आहे. संस्थेच्या दि. ०४/१०/२०२४ रोजीच्या सभेत पारित झालेल्या ठराव कायम करण्यात येत आहे. तसेच संस्थेच्या निर्णयास खालील अटी व शर्तीस अधिन राहुन ना हरकत देण्यात येत आहे.

१. सदर विकसन करारनामा महाराष्ट्र नोंदणी अधिनियम १९०८ अन्वये सक्षम प्राधिकारी यांचे समोर नोंदविण्यात यावा.
२. सदर पुनर्विकास प्रक्रियेबाबत घेतलेल्या निर्णयास व कार्यवाहीस समिती पदाधिकारी व्यक्तीशः व सामुदायिकरित्या जबाबदार राहतील.
३. पुनर्विकास प्रक्रियेसंदर्भात सक्षम प्राधिकरणाकडील आदेश संस्थेवर बंधनकारक राहतील.
४. संस्थेच्या पुनर्विकासाबाबत होणाऱ्या पुढील कार्यवाहीमध्ये संस्थेने पारदर्शकता ठेवावी. तसेच सभासदांना पुनर्विकासाबाबत हवी असलेली कागदपत्रे व माहिती उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संस्थेच्या व्यवस्थापक समितीची राहील.
५. शासनाचे दिनांक ०४.०७.२०१९ रोजीच्या आदेशानुसार पुनर्विकासाबाबत कार्यवाही करण्यात यावी.
६. पुनर्विकासाबाबत कोणतेही वाद उद्भवल्यास असे वाद योग्य त्या सक्षम न्यायालयात दाखल करण्यात यावेत.

(नागनाथ कंजेरी)
उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे शहर(३)

प्रत माहीतीसाठी :-
मे. एम. बी. ग्रुप, चिंचवड, पुणे